Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 04 February 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०४ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज दोन्ही सभागृहात राष्ट्रपतींच्या अभिभषाणावरच्या धन्यवाद प्रस्तावावर चर्चा पुढे सुरु राहणार आहे.

दरम्यान, लोकसभेत काल या चर्चेत सहभाग घेत, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदारांची संख्या वाढल्याबद्दल प्रश्न उपस्थित केला. लोकसभा निवडणुकीनंतर सहा महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत ७० लाख नव्या मतदारांची नावे यादीमध्ये सामाविष्ट केली गेली, असं सांगून त्यांनी निवडणूक आयोगावर टीका केली. भाजपने जिंकलेल्या मतदारसंघांमध्ये मोठ्या संख्येने मतदार वाढल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांचे हे आरोप फेटाळून लावले.

****

राज्यात विशेष करून पुणे शहरात गुईलेन बॅरी सिंड्रोम – जी बी एस रुग्णांची संख्या वाढत असली तरी हा आजार संसर्गजन्य नाही, त्यामुळे परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात सल्याचं, केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी म्हटलं आहे. या आजारावर लागणारी औषधं राज्यात पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याचं त्यांनी काल दूरस्थ माध्यमातून घेतलेल्या बैठकीत सांगितलं. केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ या बैठकीला उपस्थित होते. यावेळी नड्डा यांनी जीबीएस आजारासंबंधी सविस्तर आढावा घेत विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना महत्वपूर्ण सूचना केल्या.

दरम्यान, राज्यात आत्तापर्यंत जीबीएस आजाराचे १६३ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. त्यापैकी १२७ रुग्णांना जीबीएस आजार झाल्याचं तपासातून निश्चित झालं आहे. हा आजार वाढण्याची कारणं शोधण्यासाठी पशूसंवर्धन विभागाच्या वतीने संशोधन करण्यात येणार असल्याची माहिती, आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकिसन

पवार यांनी दिली. काल अहिल्यानगर शहरात या आजाराचा एक संशयित रुग्ण आढळून आला असून, त्याला पुढील तपासणीसाठी पुण्याच्या ससून रुग्णालयात पाठवण्यात आलं आहे.

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज दिल्लीत जम्मू आणि काश्मीरच्या सुरक्षेबाबत आढावा बैठक घेणार आहेत. या बैठकीला जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, गृहसचिव गोविंद मोहन तसंच केंद्रीय गुप्तचर संस्थांचे प्रमुख आणि वरीष्ठ अधिकारी उपस्थित असतील.

****

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी उद्या मतदान होणार आहे. यासाठीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. एक कोटी ५६ लाखाहून अधिक मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या निवडणुकीत एकूण ६९९ उमेदवार रिंगणात आहेत. शनिवारी आठ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

****

गडचिरोलीत काल दोन नक्षली दाम्पत्यांनी, जिल्हा पोलिस आणि केंद्रीय राखीव दलापुढे शरणागती पत्करली. यात एक विभागीय समिती सदस्य, एक एसीएम आणि दोन दलम सदस्यांचा समावेश आहे. या नक्षलवाद्यांवर सुमारे २८ लाख रुपयांचं बक्षीस होतं. अशोक सडमेक आणि वनिता दोहे तसंच साधू मोहंदा आणि मुन्नी कोरसा अशी या नक्षली दांपत्त्यांची नावं आहेत.

दरम्यान, गडचिरोलीत पोलिसांनी अवघ्या एका दिवसात पोलिस ठाणं सुरू केलं आहे. मुख्यालयापासून २०० किलोमीटर अंतरावर नेलगुंदामध्ये दीड हजारापेक्षा जास्त पोलिसांनी ही कामगिरी केली. नक्षलवाद्यांचं प्रशिक्षण स्थळ तसंच दोन राज्यांच्या सीमावर्ती क्षेत्रात हा भाग आहे. या कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांचं अभिनंदन केलं आहे.

****

दिव्यांग उमेदवारांना कुठल्याही विशिष्ट निकषाची पूर्तता न करता परीक्षेसाठी लेखनिक सुविधा द्यावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयानं काल दिले. यापूर्वी केवळ ४० टक्के दिव्यांगत्व असणाऱ्यांना लेखनिक वापरण्याची मुभा होती. एका उमेदवारानं दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयानं, लेखनिकांसाठी असलेला वैधता कालावधी वाढवण्याचे, तसंच येत्या दोन महिन्यात या सर्व निर्देशांचं पालन करण्याचे आदेश दिले.

****

राष्ट्रीय महामार्गांवरुन प्रवास करणाऱ्या वाहनांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकार एकसमान टोल आकारणी धोरण तयार करण्याचा विचार करत आहे, अशी माहिती केंद्रीय परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. रस्त्यांच्या परिस्थितीविषयी प्रवाशांकडून आलेल्या तक्रारींची दखल घेऊन सरकार संबंधित कंत्राटदारांवर कठोर कारवाई करत असल्याचं, त्यांनी सांगितलं.

****

अहिल्यानगर जिल्ह्यात शेवगाव इथं आयोजित ३७ व्या पक्षीमित्र संमेलनाचा काल समारोप झाला. पक्षीमित्र संघटनेच्या माध्यमातून पक्षीसंवर्धन, निसर्ग आणि पर्यावरणाचं संतुलन राखलं जात आहे हे उल्लेखनीय असून, याबाबतचे अनेक प्रकल्प मार्गी लावण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करायला हवा असं मत यावेळी व्यक्त करण्यात आलं. या दोन दिवसीय संमेलनात पक्षी संवर्धनाशी संबंधीत विविध मुद्यांवर चर्चा करण्यात आली, तसंच जायकवाडी इथं पक्षी निरीक्षण करण्यात आलं.

****

नांदेड विभागात रेल्वे तिकीट खिडकीवर तिकीट खरेदी करण्यासाठी सर्व ७० स्थानकांवर **QR** कोड सुविधा विस्तारीत करण्यात आली आहे. सर्व रेल्वे प्रवाशांनी तिकिट खरेदीसाठी या सुविधेचा वापर करण्याचं आवाहन विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नीति सरकार यांनी केलं आहे.

****